# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) जयपूर येथील सुरेश ग्यान विहार विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय मिनी गोल्फ (पु/म) स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या खेळाडूंनी १५ पदके प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले.

दि. १ ते ५ मार्च दरम्यान जयपूर येथील सुरेश ग्यान विहार विद्यापीठात आयोजित अखिल भारतीय मिनी गोल्फ (पु/म) स्पर्धेत विविध क्रीडा प्रकारात विद्यापीठाच्या खेळाडूंनी १५ पदके प्राप्त करून देदिप्यमान कामगिरी केली. मिक्स डबल महिला या प्रकारात प्रतीक देशमुख (अॅड एस.ए. बाहेती महाविद्यालय, जळगाव), पोर्णिमा चव्हाण (मु.जे. महाविद्यालय, जळगाव) यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले. तर फेअर व सिंगल प्रकारात किर्ती बाविस्कर (डॉ.जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव), शेखर ताडे (मु.जे. महाविद्यालय, जळगाव), जयेश जाट (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जामनेर) यांनी रौप्य पदक प्राप्त केले. सांघिक महिला प्रकारात स्वाती गाढे (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जामनेर), काजल बारोट, धनश्री सपकाळे (पी.ओ. नाहाटा महाविद्यालय, भुसावळ), भाविका राठोड (डॉ.जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव), आसमा तडवी (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाल), अनुष्का काबरा, वैष्णवी गुंजाळ (मु.जे. महाविद्यालय, जळगाव), विशाखा चौधरी (प्रा. रविंद्र निकम फार्मसी महाविद्यालय, धुळे) यांच्या संघाने रौप्य पदक प्राप्त केले. तसेच मिक्स डबल या प्रकारात शुभम वाणी व राजश्री नाफडे (पी.ओ. नाहाटा महाविद्यालय, भुसावळ) या खेळाडूंनी कास्य पदक प्राप्त केले. प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक डॉ. आनंद उपाध्याय व डॉ. नवनित अस्सी, डॉ. अमोल पाटील यांनी काम पाहिले. या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले अशी माहिती क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांनी दिली.

## बातमी नं. २

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात उमवि मनस्विनी महिलांच्या ग्रुपतर्फे शनिवार दि. ११ मार्च रोजी ॲक्युप्रेशर आणि आरोग्य समस्या या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी सौ. शैलेजा माहेश्वरी, डॉ. सुहास नेमाडे (नॅचरोपॅथी) व डॉ. निशीगंधा नेमाडे हे होते. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. सुहास नेमाडे यांनी व डॉ. निशीगंधा नेमाडे यांनी महिलांच्या आरोग्य समस्या व त्यावरील उपाय आणि ॲक्युप्रेशर उपचार पध्दतीबाबत सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमात विद्यापीठातील सेवानिवृत्त महिला माधुरी पाटील, स्मिता पाटील, पुष्पा पाटील व भारती भावसार यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात रेखा धम्मरत्न व कल्पना गांवडे यांनी कविता व गीत सादर केले. विद्यापीठातील नियमित महिला, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, कंत्राटी शिक्षक/कर्मचारी, दैनिक वेतनिक कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. मधुलिका सोनवणे व डॉ. मनिषा जगताप ह्या होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोनाली दायमा यांनी तर आभार निता शिंदे यांनी मानले.

# जनसंपर्क विभाग

## बातमी नं. ३

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्र, सामाजिकशास्त्र प्रशाळा व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ व १८ मार्च रोजी "महिला आरोग्य संवर्धन ऋतुमती अभियान" आयोजित करण्यात आले आहे.

हे अभियान मु. पो. शेरी ता. धरणगाव, जि. जळगाव येथे होत असून या अभियाना अंतर्गत शेरी या गावातील महिलांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेण्यासाठी या अभियानात सहभागी विद्यार्थी गावाचे सर्वेक्षण करतील तसेच पथनाट्याच्या माध्यमातून आरोग्य विषयक जनजागृती केली जाईल. तसेच "महिलांच्या आरोग्य विषयक समस्या" प्रश्नावलीच्या माध्यमातून समजून घेऊन महिलांना येणा-या आरोग्य विषयक अडचणी, त्यावरील उपाययोजना, त्यांना स्वत:च्या आरोग्याचे महत्व सांगणे यासाठी तज्ज्ञ महिला डॉक्टरांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाईल. अशी माहिती स्त्री अभ्यास केंद्राच्या प्रमुख डॉ. संजिवनी भालसिंग यांनी दिली.

## बातमी नं. ४

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेत वार्षिक स्नेहसंमेलन (केमक्रुझ-२०२३) संपन्न झाले.

दि. ८ ते १० मार्च या कालावधीत विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेत आयोजित स्नेहसंमेलनाचा समारोप अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांच्या उपस्थितीत झाला. या संमेलनात विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकास, गायन, नृत्य, नाटक, प्रश्नमंजूषा, कॉमेडी, ललितकला, छायाचित्र प्रदर्शन व विविध सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत २०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यावेळी अध्यक्षस्थानी संचालक प्रा. जे.बी. नाईक, प्रा. जी.ए. उस्मानी, डॉ. विकास पाटील, प्रा. ए.के. गोस्वामी, प्रा. रवींद्र पुरी, डॉ.यु.डी. पाटील, डॉ. जितेंद्र नारखेडे यांच्या हस्ते विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले. समन्वयक प्रा.विश्वराज तायडे यांनी आभार मानले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक:११ मार्च, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारीकरीता